जा.क. 594 /जनसंपर्क कक्ष/वार्तापत्र, पोलीस अधीक्षक कार्यालय भंडारा

दिनांक : 06/11/2018

| अ. क्रं | पो.ठाणे गु.र.नं. व कलम | फिर्यादीचे पुर्ण नांव, व पत्ता | आरोपीचे पुर्ण नाव, व पत्ता | घटना स्थळ व घटना ता.व वेळ | गुन्हा दाखल ता. व वेळ | घटना स्थळ | गुन्हयाची थोडक्यात हकीकत तपासणी अधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | 2 | 3 | 4 | 5 | | 6 | ८ |
| 1 | साकोली अप.क. 421/2018 कलम 456 भादंवि. | श्रीमती सुशिला सुरेश कोरे वय 45 वर्ष रा. निलज | मनिष अशोक कोरे वय 24 वर्ष रा. पळसगाव | 04/11/2018 20.00 वा. दर | 05/11/2018 चे 12.23 वा. | निलज टोली 18 कि.मी. दक्षिण | यातील फिर्यादी ही मुलगी कु. भाग्यश्री हीचे सोबत घरी हजर असतांना यातील आरोपी हा फिर्यादीचे घरात प्रवेश करून चोरी करण्याचे उद्देशाने फिर्यादीचे हाताला झटका मारुन पळून गेल्याने फिर्यादीचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोलीस हवालदार चांदेवार हे करीत आहेत. मो. नं. 9604348532 |
| 2 | साकोली अप.क. 422/2018 कलम 279,337 भादंवि सहकलम 128,184 मोवाका. | अमित टिकाराम पंचभाई वय 28 वर्ष रा. हेटी ता. सडक अर्जुनी जि. गोंदिया | स्कुटी क. एम.एच. 36 ए.सी. 0328 चा चालक | 05/11/2018 चे 10.30 वा. दरम्यान | 05/11/2018 चे 18.04 वा. | विर्सी गावचे नाल्याजवळ 7 कि.मी. उत्तर | यातील फिर्यादीचा चुलतभाऊ सत्वशिल रामकृष्ण पंचभाई रा. हेटी हा त्याचे मोटार सायकल क. एम.एच. 31 बि. एल 9047 नी ग्राम हेटीवरुन साकोली येथे येत असतांना विर्सी गावचे नाल्याजवळ यातील आरोपी चालकाने आपले ताब्यातील स्कुटीवर 3 मुली बसवून स्कुटी भरधाव वेगाने व लापरवाहीने चालवुन फिर्यादीचे चुलत भावाचे मोटार सायकलला धडक देवुन त्याचे कपाळावर, नाकावर व डावे हातावर मार लागुन जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉक्टरी परीक्षण रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोलीस हवालदार टेभुर्णे हे करीत आहेत. मो. नं. 9764453273 |
| 3 | आंधळगाव अप.क. 169/2018 कलम 283 भादंवी. | सर तर्फे परीपोउपनि. इंगळे पो.स्टे. आंधळगाव | सोनालिका ट्रॅक्टर क. एम.एच. 36 जि 3292 चा चालक धर्मपाल अरविंद चव्हाण वय 36 वर्ष रा. पांढराबोडी | 05/11/2018 चे 17.30 वा. ते 18.00 वा. | 05/11/2018 चे 19.26 वा. | आंधळगाव बसस्टॉप चौक अर्धा कि.मी. पुर्व | यातील आरोपी चालकाने आपले ताब्यातील सोनालिका ट्रॅक्टर हा आंधळगाव येथील बसस्टॉप चौकात सार्वजनिक डांबरी रोडवर मधोमध उभे करून येणारे जाणारे वाहनांना व लोकांना अडथळा निर्माण करुन व एखादा अपघात होवुन जिवित हानी होईल अशा प्रकारे बेवारस व चालु स्थितीत उभे करून सोडून गेल्याचे मिळून आल्याने पोलीस स्टेशन आंधळगाव येथे गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास परिपोउपनी. इंगळे हे करीत आहेत. मो. नं. 9661733757 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | जवाहरनगर अप. क. 253/18 कलम 11(1)(घ)(ड) प्राण्यांना कृरतेने वागविण्याचा कायदा 1960 सहकलम 09 प्राणी संरक्षण अधि. सहकलम 119 मपोका. सहकलम 47(1)(बि), 4850,54(1)(2) प्राण्यांचे वाहतुक करतांना नियम 1978 सहकलम नियम 125(इ)(1)(2) केंद्रिय मोटार वाहन अधि. | सर तर्फे पोउपनि. सतिश खेडेकर पोस्टे. ज.नगर | क्वालीस गाडी क. एम. एच. 04 बि.एस. 4500 चा चालक | 5/11/18 चे 12.15 ते 13.15 वा. दर. | 05/11/2018 चे 17.46 वा. | एन.एच. 6 रोड शहापुर गावाजवळ उड्डान पुलाजवळ 7 कि.मी. पुर्व | यातील क्वालीस जिप. गाडी एम.एच. 04 बि. एस. 4500 किंमती 1 लाख रूपये चा चालक आरोपी याने आपले ताब्यातील क्वालीस जिप गाडी मध्ये लाल रंगाच्या 3 गायी लाल रंगाचे 2 गोरे असे 5 जिवंत जनावरे व एक पांढ-या रंगाची मृत गाय असे एकुण 06 जनावरे किंमती 48 हजार रूपयेचे दाटीवाटीने कोंबुन अपु-या जागेत जनावरांना त्रास होईल अशा स्थितीत वाहतुक करीत असतांना मिळून येवुन मौका जप्ती पंचनामा कार्यवाही करून सफौ. 309 शेंडे यांनी सदर जनावरे आशा गौरक्षण संस्था डब्बा (धारगाव) येथे जमा केलेले आहे. अशा फिर्यादीचे लेखी तकारीवरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोलीस हवालदार रामटेके हे करीत आहेत. मो. नं. 9420901442 |

पोलीस उपनिरीक्षक
जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधीक्षक कार्या.भंडारा

प्रति,
जिल्हा माहीती अधिकारी, भंडारा
दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द
करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.
**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता